**स्थायी निदेश क्र. ३२**

**नगरपरिषदेतील वाहने खरेदी व वापरा संबंधीचे धोरणाबाबत एकत्रित आदेश**

**(या स्थायी आदेशामध्ये खालील आदेश समाविष्ट करण्यात आलेले आहेत.**
**१.दुरुस्तीपत्रक परिपत्रक क्र. नप्रस/वाहन धोरण/२००५/प्र.क्र.०५/९ दिनांक : २० जूलै, २००५**
**२.सुधारणा परिपत्रक क्र. नप्रस/वाहन धोरण/२००५/प्र.क्र.०५/९. दि.१८ ऑगस्ट, २००५**
**३. सुधारणा परिपत्रक क्र. नप्रस/वाहन धोरण/२००५/प्र.क्र.०५/९. दि.२९ ऑक्टोबर,२००५**
**४. सुधारणा परिपत्रक क्र. नप्रस/वाहन धोरण/२००५/प्र.क्र.०५/९. दि. ३ मे, २००६**
**५. सुधारणा परिपत्रक क्र. नप्रस/वाहन धोरण/२००५/प्र.क्र.०५/९. दि. १ सप्टेंबर, २००६**

---

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र. नप्रस/वाहन धोरण/२००५/प्र.क्र.०५/९.
दिनांक :१० मे,२००५

**परिपत्रक**

**पहावे :** १) वित्त विभाग निर्णय क्र.वाहन-१०००/प्र.क्र.६५/२००१ विनियम, दिनांक १०/९/०१.
२) शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.एमयूपी ४८०३/१२३६/ प्र.क्र.२६६/नवि-१९, दि.४/९/०३.
३) या संचालनालयाचे परिपत्रक क्र.नपाप्र/वाहन खरेदी/२४१४/प्र.क्र.९५१/०४/९, दि.२९/१०/०४.

**प्रस्तावना :**

वित्त विभाग शासन निर्णय क्र.वाहन/प्र.क्र.६५/२००१/विनियम. दिनांक १०/९/२००१ अन्वये शासकीय कार्यालये, शासनाचे सार्वजनिक उपक्रम, शासन अनुदानित आस्थापना / संस्था या मध्ये वाहनांच्या वापरासंबंधी धोरण जाहिर केले आहे.उक्त धोरणानुसार नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एम.यु.बी. ४८०३ /१२३६ /प्र.क्र.२६६/नवि १९ दि. ४/९/२००३ अन्वये नगर परिषदांना वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्या बाबतचे अधिकार संचालक नगरपालिका प्रशासन यांना प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे वाहन खरेदी व वापरासंबंधी चे धोरण ठरविण्याची बाब या संचालनालयाचे विचाराधीन होती.

०२. मा.मुख्यमंत्री महोदयाचे अध्यक्षतेखाली दि.१४/२/०५ रोजी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद महासंघ, मुंबई यांच्या निवेदनातील मागण्या संदर्भात झालेल्या बैठकी मध्ये आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय आणि नगराध्यक्ष यांचे समिती गठीत करून नगरपरिषदांना वाहन खरेदी व वापराबाबतचे धोरण निश्चीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार आयुक्त तथा संचालक ,नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे अध्यक्षतेखाली वेळोवेळी झालेल्या समितिच्या बैठकीतील चर्चेनुसार नगरपरिषदांकरिता वाहन खरेदी व वाहन वापर संदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत .

## निर्णय

नगरपरिषदांकरीता वाहन खरेदी व वाहन वापरासंबंधी पुढील प्रमाणे वाहन धोरण विहित करण्यात येत आहे.

**अयांत्रिक व इंधनावर न चालणारी वाहने**

०३. जी वाहने इंधनावर चालत नाहीत (उदा. अयांत्रिक पध्दतीच्या घंटागाडया, ट्रोली, फिरते शौचालय इ.) अशा वाहनांच्या खरेदीकरीता नगरपरिषदेला या संचालनालयाचे पूर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही. तथापि इंधनावर न चालणा-या परंतु ज्यासाठी नेहमी / दररोज वाहन आवश्यक आहे. (उदा. सक्शन युनिट, टँकर इ.)अशा वाहनांच्या खरेदीकरीता या संचालनालयाची पूर्व परवानगीची आवश्यकता असेल. **(सुधारणा परिपत्रक. दि.२९ ऑक्टोबर, २००५ नुसार समाविष्ट.)**

**कार्यालयीन कामासाठी बहुउपयोगी वाहन**

०४. नगरपरिषदेला वेगवेगळया सेवा पुरविण्यासाठी वेळोवेळी साहित्य व इतर बार्बी एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी घेउन जाणे आवश्यक असते. या साठी नगरपरिषदेला स्वतःचे एक बहुउपयोगी वाहन (utility vehicle) खरेदी करणे गरजेचे असल्यास नगरपरिषदेला एक ट्रॅक्टर (आवश्यक ट्रॉली इ.सह) किंवा एक तीन चाकी रिक्षा असे एक वाहन अनुज्ञेय असेल. आस्थापनाखर्च विहित मर्यादेचे आत असल्यास (अ वर्ग - ४०% , ब वर्ग ४५% , क वर्ग ५०%) अशा प्रकारचे जास्तीत जास्त एक वाहन खरेदी करण्याकरीता या संचालनालयाची पूर्व परवानगी आवश्यक असणार नाही.
**(सुधारणा परिपत्रक क्र. नप्रस/वाहन धोरण/२००५/प्र.क्र.०५/९. दि. १ सप्टेंबर, २००६)**

०५. आस्थापना खर्च वरील मर्यादेचे वर असल्यास, किंवा एका पेक्षा अधिक बहुउपयोगी वाहन खरेदी करण्या करीता या संचालनालयाची पूर्व परवानगी आवश्यक असेल.

**अध्यक्ष व मुख्याधिकारी यांचेकरिता वाहन**

०६. नगरपरिषदेच्या प्रशासकिय व्यवस्थेमध्ये अध्यक्ष व मुख्याधिकारी प्रमुख कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांना नगरपरिषद हद्दीमध्ये अनेक ठिकाणांना भेटी दयाव्या लागतात. उदा.नगरपरिषदेकडून होत असलेल्या विकास कामांची पाहणी करणे, नागरिकांचे तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्थळनिरिक्षण करणे. तसेच नगरपरिषदांचे प्रस्तावांच्या मंजूरीसाठी विभागीय मुख्यालय, जिल्हा मुख्यालयांना भेटी दयाव्या लागतात. अशा सर्व प्रशासकिय कामांसाठी प्रशासकिय प्रमुखांना वाहन वापर अनुज्ञेय करणे गरजेचे ठरते.

०७. राज्यातील नगरपरिषदांच्या कामकाजाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, बहुतांश नगरपरिषदां सध्या आर्थिकदृष्टया दुर्बल अवस्थेत आहेत. त्यापैकी काही नगरपरिषदांना तर कर्मचाऱ्यांचे पगारसुध्दा वेळेवर करता येत नाहीत. नागरीकांना मुलभूत सेवा पुरविल्या जात नाहीत किंवा जेथे पुरविल्या जातात तेथे दर्जा चांगला नाही. नगरपरिषदेच्या विकासाच्या/ नागरी सुविधा पुरविण्याच्या योजना राबविण्यासाठी नगरपरिषदेच्या आस्थापना खर्चामध्ये आवश्यक प्रमाणात बचत करुन जास्तीत जास्त निधी विकासासाठी उपलब्ध होईल असे धोरण आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि-२७, दि.२८.९.२००० नुसार आस्थापनेवरील खर्चाची कमाल मर्यादा विहीत केलेली आहे. अशा आस्थापना खर्चाचे मर्यादेमध्ये वाहना वरील देखभाल व दुरुस्ती, इंधन तसेच त्याच्या चालकावरील खर्चाचा समावेश असतो. नवीन वाहन खरेदी केल्यास आस्थापना खर्चात साहजीकच वाढ होणार आहे,म्हणून ज्या नगरपरिषदांचे एकूण आस्थापना खर्च कमाल मर्यादेपेक्षा कमी आहे अशा नगरपरिषदांसाठी अध्यक्ष व मुख्याधिकारी यांचेसाठी खालीलप्रमाणे वाहनाचा वापर अनुज्ञेय करता येईल.

| अ. क्र. | नगरपरिषदेचा दर्जा व आस्थापना खर्चाची टक्केवारी | वाहन खरेदी / वाहन वापराची अनुज्ञेयता | खर्चाची मर्यादा प्रतिमाह |
|---|---|---|---|
| | २ | ३ | ५ |
| १ | अ वर्ग - ३०% पेक्षा कमी<br><br>ब वर्ग- ३५ % पेक्षा कमी | (अ) अध्यक्षांकरीता<br>i) स्वत:चे एक वाहन वापरण्यांत येत असल्यास त्याची प्रतिपूर्ती, किंवा<br>ii) भाडयाचे एक वाहन वापरण्यात येत असल्यास भाड्याची अदायगी, किंवा<br>iii) रूपये ६ लक्ष पर्यंतचे सर्व उपसाधनासह नगरपरिषदेला स्वत:चे एक वाहन खरेदी करणे अनुज्ञेय असेल. या वाहना साठी इंधनावरील (डिझेल/पेट्रोल) खर्च<br>(ब) मुख्याधिकारी<br>i) भाडयाचे एक वाहन वापरण्यात येत असल्यास भाड्याची अदायगी,किंवा<br>ii) रूपये ५ लक्ष पर्यंतचे सर्व उपसाधनासह नगरपरिषदेला स्वत:चे जीप हे एक वाहन खरेदी करणे अनुज्ञेय असेल. या वाहनासाठी इंधनावरील(डिझेल/पेट्रोल) खर्च | <br>२००० कि.मी.<br>२००० कि.मी<br>२०० लिटर<br><br><br>१५०० कि.मी.<br>१५०लिटर |
| २ | अ वर्ग- ४० % पेक्षा कमी<br><br>ब वर्ग - ४५ %पेक्षा कमी | (अ) अध्यक्षांकरीता<br>i) स्वत:चे एक वाहन वापरण्यात येत असल्यास त्याची प्रतिपूर्ती, किंवा<br>ii) भाडयाचे जीप हे एक वाहन वापरण्यात येत असल्यास भाड्याची अदायगी, किंवा<br>iii) रूपये ५ लक्ष पर्यंतचे सर्व उपसाधनासह नगरपरिषदेला स्वत:चे एक वाहन खरेदी करणे अनुज्ञेयअसेल. या वाहनासाठी इंधनावरील (डिझेल/पेट्रोल) खर्च<br>(ब) मुख्याधिकारी<br>i) भाडयाचे जीप हे एक वाहन वापरण्यात येत असल्यास भाड्याची अदायगी ,किंवा<br>ii) रूपये ५ लक्ष पर्यंतचे सर्व उपसाधनासह नगरपरिषदेलास्वत:चे जीप हे एकवाहन खरेदी करणे अनुज्ञेय असेल. या वाहनासाठी इंधनावरील (डिझेल/पेट्रोल) खर्च | <br>१२५० कि.मी.<br>१२५० कि.मी.<br>१०० लिटर<br><br><br>१००० कि .मी.<br>१०० लिटर |
| ३ | कं वर्ग - ४० %पेक्षा कमी | i) प्रशासकीय कामकाजासाठी भाडयाचे एक वाहन वापरत असल्यास भाड्याची अदायगी,किंवा<br>ii) प्रशासकीय कामकाजासाठी रु.५ लक्ष पर्यंतचे जीप हे एक वाहन किंवा रुपये ७ लक्ष पर्यंतचे बहुउपयोगी एक वाहन (utility vehicle)खरेदी करणे अनुज्ञेय असेल. जीप या वाहनासाठी इंधनावरील(डिझेल/पेट्रोल) खर्च | २००० कि.मी.<br><br>२०० लिटर |
| ४ | क वर्ग - ५० %पेक्षा कमी | i) प्रशासकीय कामकाजासाठी भाडयाचे जीप हे एक वाहन वापरत असल्यास भाड्याची अदायगी,किंवा<br>ii) प्रशासकीय कामकाजासाठी रु.५ लक्ष पर्यंतचे जीप हे एकवाहन खरेदी करणे अनुज्ञेय असेल. या वाहनासाठी इंधनावरील (डिझेल/पेट्रोल)खर्च | १२५० कि.मी.<br><br>१०० लिटर |

टिप : वाहन वापरा वरील खर्चाच्या मर्यादा प्रति माह असून, एखादया महिन्यामध्ये वाहन वापरा वरील खर्च मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त झाल्यास असा खर्च पुढे येणा-या महिन्यां मध्ये समायोजित करणे अनुज्ञेय राहिल. मात्र खर्चाची मर्यादा अनुज्ञेय असलेल्या एकूण आर्थिक वर्षाच्या मर्यादे पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी वाहन वापरणा-या प्राधिका-यावर /मुख्याधिका-यावर राहिल. (सुधारणा परिपत्रक दि. १८ ऑगस्ट, २००५, दि.२९ ऑक्टोबर, २००५ व दि.३ मे, २००६ नुसार समाविष्ट.)

०७-अ अध्यक्षाकरीता वाहन वापरावरील खर्चाची मर्यादा सर्वसाधारण परिस्थितीत असून ज्या नगरपरिषदांचे अध्यक्षांना विशिष्ट कामांसाठी दौरे जास्त करावे लागतात (उदा. अध्यक्ष महासंघाचे अध्यक्ष यांचे बैठकीसाठीचे दौरे, नगरपरिषदांकरीता विशेष प्रकल्प हाती घेतल्यामुळे त्यांच्या पाठपुराव्यासाठी करण्यांत येणारे दौरे, पाणी टंचाई निवारणासाठी करण्यांत येणारे दौरे, इ.) अशा नगरपरिषदांचया विहित मर्यादेपेक्षा अधिक खर्चाच्या प्रस्तावास विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांना प्रस्तावांची गुणवत्ता तपासून मान्यता देता येईल. **(सुधारणा परिपत्रक दिनांक ३ मे, २००६ नुसार समाविष्ट)**

०८. आस्थापना खर्चाची टक्केवारी या संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र २६ आदेश क्र. नपप्रसं २००५/आस्था खर्च /प्र.क्र.९१/२००५/का -१०, दि.२३.२.२००५ चे काटेकोरपणे पालन करुन काढण्यात यावी.हा आस्थापना खर्च मागील वर्षाचे अंतीम लेख्याचे आधारे असावी. कुठल्याही परिस्थितीत अंदाजपत्रकाचे आधारे वाहन खरेदीसाठी आस्थापना खर्चाचे परिगणना करण्यात येऊ नये. वरील प्रमाणे अचूक आस्थापना खर्च काढण्याची जबाबदारी पूर्णपणे मुख्याधिकारी यांची असेल.चूकीचे आस्थापना खर्च काढून वाहन खरेदी चे प्रकरण आढळल्यास , अशी वाहन खरेदी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९६ अन्वये नियमबाहय खर्च समजण्यात येईल व झालेल्या खर्चाची पूर्ण रक्कम मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० प्रमाणे वसूलीस पात्र असेल.

०९. आस्थापना खर्चाच्या मर्यादेस अनुसरुन वाहन खरेदी अनुज्ञेय नसतांना देखील नगरपरिषदेने वाहन खरेदी चा ठराव पारित केल्यास, मुख्याधिका-यानी अधिनियमाचे कलम ३०८ अन्वये कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी यांनी अशा प्रस्तावाबाबत त्वरीत योग्यतो निर्णय घेण्याची दक्षता घ्यावी.

१०. वरीलप्रमाणे आस्थापना खर्चाच्या मर्यादे अंतर्गत वाहन खरेदी करण्याकरीता/भाड्याने घेण्याकरीता/स्वत:चे वाहन वापरावरील प्रतिपूर्ती करण्यासाठी या संचालनालयाच्या पूर्व मंजूरीची आवश्यकता असणार नाही.

११. नगरपरिषदाा आस्थापना खर्चाचे मर्यादे अंतर्गत अनुज्ञेय असलेली वाहना व्यतिरिक्त इतर कोणतेही वाहन वापर करण्याकरीता या संचालनालयाची पूर्व मंजूरी आवश्यक असेल. विशेष परिस्थिती मध्ये जिल्हाधिका-या मार्फत असा प्रस्ताव पाठवावा. वाहनाच्या आवश्यकतेची खात्री झाल्या नंतर भाडयाचे एक जादाचे वाहन विशिष्ट कालावधी साठी वापरण्या करीता परवानगी देण्याचा विचार केल्या जाईल. मात्र कुठल्याही परिस्थितित वाहनखरेदीस मान्यता देता येणार नाही.

१२. नगरपरिषदेला परिच्छेद क्र.७ मध्ये नमुद केलेल्या आस्थापना खर्चाचे मर्यादेअंतर्गत जे वाहन खरेदी करणे अनुज्ञेय असेल ते वाहन खरेदी करण्यापूर्वी पुढील बाबींची पूर्तता नगरपरिषदेने करणे आवश्यक आहे.

(अ) नगरपरिषद सर्वसाधारण सभेचा ठराव.

(ब) वित्तिय वर्षाच्या अर्थसंकल्पात वाहनखरेदी ची तरतूद तसेच इंधन व वाहन देखभाल दुरुस्तीसाठी तरतूद आवश्यक राहील.

(क) वाहन खरेदी डी.जी.एस. ॲण्ड डी.(Directorate General of supplies & Disposals) मधील दर करारानुसोर किंवा सदर दरा पेक्षा कमी दराने करता येतील.

(ड) वाहन खरेदी करण्याकरीता सर्व वित्तिय तत्वांचे पालन करण्यात यावे.

(ई) नगरपालिकेच्या मालकीच्या मोटार वाहनांचा वापर करण्यासंबंधी राज्य शासनाने आदर्श उपविधी तयार केले आहेत. हया उपविधीचा नगरपरिषदेने स्विकार करुन त्याची अमलबजावणी करणे नगरपरिषदेस बंधनकारक आहे.

१३. अध्यक्षांकरिता वापरण्यात येणारे वाहन इतर पदाधिकारी यांना, व मुख्याधिकारी यांचेकरिता वापरण्यात येणारे वाहन इतर अधिकारी यांना, आवश्यकतेनुसार वापरता येईल. क वर्ग नगरपरिषदे करीता असलेले वाहन अध्यक्ष, मुख्याधिकारी व इतर कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यात येईल.

१४. नगरपरिषदेने स्वत:चे वाहन पदाधिकारी किंवा अधिका-याना उपलब्ध करून दिल्यास अशा वाहनाकरिता सद्यस्थितीत नगरपरिषदे कडे उपलब्ध असलेल्या वाहन चालकाकडून सेवा उपलब्ध करुन घेण्यात यावी. वाहन चालक उपलब्ध नसल्यास कार्यरत असलेल्या वाहनचालक परवाना धारक कर्मचा-याची सेवा वाहनचालक म्हणून उपलब्ध करून घेण्यात यावी.

१५. भाडयाचे किंवा नगरपरिषदेच्या वाहनाचा वापर फक्त कार्यालयीन कामकाजासाठी करण्यात यावा. काही अपरिहार्य कारणास्तव खाजगी कामासाठी वाहनाचा वापर केल्यास शासनाद्वारे विहित केलेल्या कि.मि. दराने संबंधिताकडून अशा खर्चाची रक्कम वसूल करण्यात यावी.

**नगरपरिषदेचे वाहनासाठी खर्चाचे निकष**

१६. अध्यक्ष व मुख्याधिकारी यांना नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या वाहनांच्या देखभाल, दुरुस्तीसाठी व वाहने सुस्थितीत ठेवण्याकरीता पेट्रोलवर चालणा-या प्रत्येक वाहनांसाठी प्रतिवर्षी रु.२५०००/-पर्यंत व डिझेल वर चालणा-या प्रत्येक वाहनांसाठी प्रतिवर्षी रु.३००००/-पर्यंत खर्च करण्याची मर्यादा असेल.

१७. या खर्चाच्या मर्यादे पेक्षा जास्त होणारा खर्च वाहन वापरणा-या प्राधिका-याने स्वत: सोसावा.

१८. लांबच्या अंतरा करीता किंवा जिल्हाबाहेरील दौरांसाठी शक्यतोवर वाहनांचा वापर करण्यात येऊ नये.

**स्वत:चे वाहन वापरा करीता निकष**

१९. नगरपरिषदेचा आस्थापना खर्च वरील मर्यादेच्या आत असल्यास व अध्यक्ष स्वत:चे वाहन नगरपरिषदेच्या कामकाजासाठी वापरत असल्यास खर्चाची प्रतिपूर्ती नगरपरिषद निधीमधून अनुज्ञेय असेल. ही प्रतिपूर्ती शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या दराप्रमाणे करता येईल.

**भाडयाचे वाहन वापरा करीता निकष**

२०. नगरपरिषदां कडे वाहने उपलब्ध नसल्याने कार्यालयीन कामकाजा साठी वाहन भाडयाने घ्यावयाचे झाल्यास, त्यासाठी सर्व साधारण पणे पुढील अटी असतील.

अ) भाडयाचे दर निश्चित करताना ते वाहनचालक व इंधन खर्चासह असावे.

ब) भाडयाने वाहन घेताना ते अवातानुकूलीत व जास्तीत जास्त मैलअंतर (milleage) देणारे (उदा. इंडिका, मारुती इ.) असावे.

क) वाहनांचे दरासाठी वरील अटी व शर्ती नमूद करुन निविदां मागविण्यात याव्यात व त्यांना जास्तीत जास्त प्रसिध्दी दयावी. बाजार भावाशी तुलना करून निविदाधारकनिवडावा. अवाजवी दराने वाहन करारावर घेऊ नये.

ड) वरील मर्यादेपेक्षा जास्त होत असलेला खर्च संबंधीतांस सोसावा लागेल. असा खर्च नगरपरिषदेतर्फे अदा केला जाणार नाही.

**अग्निशमन सेवाकरिता वाहने खरेदी**

२१. अग्निशमन सेवेची व्यवस्था करणे हे नगरपरिषदेचे कर्तव्य आहे. अग्निशमन सेवा उपलब्ध होण्यासाठी य संचालनालयाने सर्वकष धोरण निश्चित केले असून यासाठी या संचालनालयाचे स्थायी आदेश क्र.३१ नप्रस/अग्निशमन सेवा/२००५/ प्र.क्र.३१४/९/, दि.२५. एप्रिल, २००५ नुसार निश्चित केलेल्या अग्निशमन सेवाविषयक धोरणाचा विचार करुन नगरपरिषदांना अग्निशमन सेवेकरीता वाहने खरेदी करता येतील.

**रुग्णवाहिका वाहन खरेदी**

२२. नागरिकांचे आरोग्य संवर्धनासाठी रुग्णवाहिका सेवा उपलब्ध असणे गरजेचे आहेत. परंतु अशी सेवा शक्यतो सेवाभावी संस्था किंवा खाजगी संस्था यांचेकडून उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

२३. ज्या शहरामध्ये अशासकीय संस्थाची सेवा उपलब्ध होऊ शकत नाही व ज्यांचेकडे २० खाटांचे रुग्णालय आहे अशा अ व ब वर्ग नगरपरिषदेकरीता वाहन खरेदी करण्याची खास बाब म्हणून मंजूरी देण्याबाबत विचार केल्या जाईल. परंतू मंजूरी देण्या अगोदर नगरपरिषदेने खालील अटीं व शर्ती मान्य करणे आवश्यक राहील.

अ) नगरपरिषदेने रुग्णवाहिका खरेदी केल्यानंतर ती वाहने अशासकीय संघटना यांचे माध्यमातून चालविण्याचे असल्याने त्यासाठी कोणताही कर्मचारी वर्ग मंजूर करता येणार नाही.

ब) सदरचे वाहन अशासकीय संघटनांच्या माध्यमातून चालवण्यात येतील.

क) वाहनाची सर्व देखभाल, दुरुस्ती व इंधन इत्यादी वरील खर्च सेवा भावी संस्था मार्फत केल्या जाईल.

ड) कराराची मुदत (Contract Period) संपल्यानंतर सेवा भावी संस्था सुरक्षीतपणे वाहन नगरपरिषदेला परत करतील.

इ) वाहन फक्त रुग्ण व शव यांच्या वाहतूकीसाठी वापरण्यात येईल.

फ) अशासकीय संघटनांना नगरपरिषद ठरवेल त्या दराने रुग्णवाहीका सेवेचा शुल्क वसुल करतील. हे शुल्क नगरपरिषदेचे क्षेत्रातील नागरीकसाठी व नगरपरिषद क्षेत्रा बाहेरील नागरीकांसाठी वेगवेगळा असू शकेल.

**खाजगी मालमत्ताना सेवा पुरविण्याकरीता वाहन**

२४. नगरपरिषद हद्दीतील खाजगी मालमत्ताना नगरपरिषदेकडून काही सेवा पुरविण्यात येतात व या सेवेसाठी लाभार्थ्यांकडून सेवा शुल्क वसूल केल्या जातो. (उदा. संक्शन युनिट, पाणी पुरवठा टँकर, हॉटेल्सचा व जैव वैद्यकिय घनकचरा उचलणे इ). नगरपरिषदेद्वारे सेवा शुल्क वसूल करुन अश्या सेवा पुरविण्याऐवजी नगरपरिषदा खाजगी कंत्राटदाराला अशा प्रकारचा सेवा पुरविण्यासाठी प्राधिकृत करु शकतात. नागरीकांनी वरील सेवे साठी आपली मागणी नगरपरिषदेकडे नोंदविल्यास किंवा कंत्राटदाराकडे थेट नोंदविल्यास, कंत्राटदार स्वत: नगरपरिषदे द्वारा विहित केलेल्या दराने सेवा शुल्क वसुल करुन सेवा पुरवू शकतील. हीसेवा देणारा कंत्राटदार योग्य प्रकारे सेवा देतो किंवा नाही (उदा. सेवें चा दर्जा, आकारलेले दर, वेळेत सेवा पुरविलेली किंवा नाही इ.)याच्या वर नगरपरिषदेला नियंत्रण ठेवता येईल.